पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १५**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १४/७/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २८६**

मा.हरिदास चरवड यांचे दि.६/७/२०२० चे पत्र.

कोरोना विषाणू सारख्या महामारीमुळे सर्व मानव समाजावर परिणाम झाला असून असंख्य छोटे-मोठे व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत. त्यातीलच सलून व्यावसायिक एक मुख्य घटक असून गेल्या चार महिन्यापासून हा व्यावसायिक मोठ्या अडचणीतून जात आहे. आर्थिक विवंचनेतून आत्महत्यांचे प्रकार घडले आहे.

अनलॉकच्या प्रक्रियेत कडक अटी आणि शर्तीवर या व्यवसायाला परवानगी मिळाली मात्र करोना विषाणूच्या भीतीने ग्राहकांची संख्या रोडावली आहे, त्यात चार महिने व्यवसाय बंद असल्याने असंख्य देणी बाकी आहे. तसेच कौटूंबिक उपजीविका भागवनेही अवघड झाले आहे. पुणे शहरात असंख्य हातावर पोट असलेले सलून व्यावसायिक असून त्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे.

तरी पुणे शहरातील सलून दुकानदारास प्रत्येकी ५००० रुपयाची आर्थिक मदत करण्यात यावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २८७**

दि. २२/६/२०२० ते दि. २८/६/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ०९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/१५३ दि. २/७/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २८८**

कोविड-१९ ची रोगराईमुळे तसेच अन्य कारणामुळे दि. ३१/०३/२०२० अखेर पर्यन्त झालेल्या कामांची/आदा न केलेल्या बिलांकरिता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दि. २८/०४/२०२० अन्वये दि.३०/०५/२०२० अखेर पर्यन्त दिलेल्या मुदतवाढी मध्ये प्राप्त झालेली सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पातील ज्या भांडवली व विकास कामांची देयके प्राप्त झाली आहे अशी बिले अदा करण्यासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामधून तरतूद उपलब्ध करुन देणेस व अशा कामांची देयके अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कपात करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि.१६/६/२०२० चे पत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य खाते- | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.३७५.६० कोटी | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या संबंधीत मुख्य खात्याच्या भांडवली तरतूदीमधून करावी. |
| २) | ' स ' यादी- | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.२९७.१३ कोटी | अ) सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील भांडवली ''स'' यादीच्या तरतूदीतून सरसकट सर्व मा.सभासदांच्या ''स'' यादीला २५ टक्के कपात **किंवा**<br>ब) ज्या मा. सभासदाच्या कामांची |

देयके आदा करावयाची आहेत .
त्याच मा. सभासदांच्या सन
२०२०–२१च्या
अंदाजपत्रकातील भांडवली
''स'' यादी मधुन

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २८९**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड–१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड– सीई२२अे७०५/एसजे२१–३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | –– |
| नविन सुचविलेले काम | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड – आरई१७एफ१४७व्ही | –– | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९०**

मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. १/७/२०२० चे पत्र.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये एका इमारतीवरुन दुसऱ्या इमारतीवर ओव्हरहेड टि.व्ही. केबल, इंटरनेट/ब्रॉडबँड केबल तसेच ओ.एफ.सी. केबल टाकण्यासाठीची तरतुद नाही त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व बेकायदेशीर केबल्स शहराचे विद्रुपीकरण करीत असल्याने काढुन टाकण्यात याव्यात.

पुणे महानगरपालिकेमध्ये याबाबत योग्य ठराव करुन सदर सर्व प्रकारच्या टाकलेल्या ओव्हरहेड केबल्स आणि नव्याने टाकण्यात येणाऱ्या केबल्स यामध्ये सुसूत्रता आणून प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक ठराविक शुल्क आकारुन त्यातून महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह विभाग आकारात असलेल्या शुल्काच्या प्रमाणात उत्पन्न मिळविता येईल.

किंवा सदर सर्व केबल धारकांना इमारतीवरुन ओव्हरहेड केबल टाकण्यास मनाई करुन त्या सर्व केबल्स पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या भुमिगत डक्ट मधून टाकण्यास बंधनकारक करुन, केबल धारकांना प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक शुल्क आकारुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसूल मिळवता येईल.

तरी करोना विषाणूच्या संसर्गामुळे पुणे महानगरपालिकेच्या महसुलामध्ये घट झालेली आहे ती भरुन काढणेसाठी याबाबत ठराव करुन महानगरपालिकेचा महसुल वाढविण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९१**

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रस्तावांना प्रिमियम शुल्क टप्प्यामध्ये खालीलप्रमाणे भरण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेस

अ) ७० मी. पेक्षा कमी उंची असलेल्या इमारतींकरिता ३३%, ३३%, ३४% रक्कमेचे ३ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत

ब) ७० मी. किंवा ७० मी. पेक्षा जास्त उंची असलेल्या इमारतींकरिता २५%, २५%, २५%, २५% रक्कमेचे ४ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या व ३६ व्या महिन्यांत

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. पोटी

जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस
४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास
५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास
६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस
७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९२**

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थे अंतर्गत कार्यरत कचरा वेचकांस कोविड आजाराच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रोत्साहन भत्ता देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्य./१४० दि.२५/६/२०२० चे पत्र.

१) वस्ती पातळीवरील दारोदारी कचरा संकलन करणाऱ्या कचरा वेचकांस महानगरपालिकेमार्फत प्रत्येक घरामागे देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता हा १० रु. ऐवजी २० रुपये प्रती घर प्रति महिना याप्रमाणे सहा महिने कालावधीकरीता अदा करणेस
२) हा प्रोत्साहन भत्ता पुनर्वसन केलेल्या झोपडपट्ट्या (SRA) तसेच अघोषित झोपडपट्टी क्षेत्रासही लागू करणेस
३) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात बदल/आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस
४) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविण्यात येईल व पर्यायी व्यवस्था करण्यात येईल व याबाबतचा निर्णय घेण्याचा व पर्यायी व्यवस्था करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. २९३**

प्रभाग क्र.९ बाणेर–बालेवाडी–पाषाण–सुतारवाडी –सोमेश्वरवाडी–पचंवटी भागात कचरा संकलन करण्यासाठी पुणे म.न.पा.कडून स्वच्छ संस्थेस अनुदानित करारानुसार नियुक्त करण्यात आले आहे. सदर संस्थेस वार्षिक ५ कोटीचे अनुदान म.न.पा.कडून दिले जाते,तरी देखील या भागात सदर संस्था मोनोपोली होत आहे. सदर संस्थेकडून या भागात व्यवस्थित कचरा संकलन होत नाही तसेच नागरिकांची गैरसोय होत असल्याच्या अनेक तक्रारी आमच्याकडे वारंवार प्राप्त होत आहेत.

तरी या भागात नागरिकांची गैरसोय थांबविण्याकरीता याभागातील काही सोसायटी व गावठाणात श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या संस्थेस कचरा संकलनासाठी कार्यरत करण्यात आले. या संस्थेमार्फत कोरोना काळात लॉकडाऊन असताना देखील या संस्थेने व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी अखंडपणे जीवाची बाजी लाऊन कोविड योध्याप्रमाणे काम केले व कचरा संकलन करून घेतले.

तरी या भागात कार्यरत असणारी स्वच्छ संस्था हि म.न.पा.अनुदानित आहे व या उलट श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस ही संस्था विनाअनुदानित पध्दतीने कार्य करीत आहे. तसेच श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस संस्था ही ओला कचरा हा ज्या–त्या सोसायटीमध्येच योग्य प्रकारे उपाययोजना करून जिरवण्याचे काम करीत आहे.याउलट स्वच्छ ही संस्था ओल्या कचऱ्याचे संकलन देखील करीत नाही.त्यामुळे सोसायटी व वस्त्यांमध्ये ओला कचरा विल्हेवाट लावण्याची गैरसोय होत आहे. तसेच स्वच्छ संस्थेस पुणे म.न.पा.च्या अनुदानासोबतच कचरा घंटागाडी व इतर सोयीसुविधा तसेच साहीत्य देखील पुरविले जाते परंतु श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या

संस्थेस कोणत्याही प्रकारची सोयी सुविधांची मागणी पुणे म.न.पा.कडे करीत नाही व स्वत:कार्यरत पध्दतीने याभागात काम करीत आहे.

तरी सदर श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या संस्थेस बाणेर–बालेवाडी भागामध्ये काम करण्याची परवानगी देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती,व मा.सौ.ज्योती कळमकर,मा.सौ.स्वप्नाली सायकर यांचे दि.२६/६/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७ दि.२६/६/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. २९४**

प्रभाग क्र.९ बाणेर–बालेवाडी–पाषाण येथील मौजे बाणेर स.नं.८२ येथील ओटा मार्केटचे काम पूर्ण होऊन ५ वर्षे झाली आहेत. तरी सदर वास्तू विनावापर अभावी खराब होत आहे व त्यातून पुणे महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान देखील होत आहे.

सदर ओटा मार्केट मधील गाळे लवकरात लवकर महानगरपालिकेने विशिष्ठ धोरण ठरवून भाडे तत्वावर देण्यात यावे जेणेकरून पुणे म.न.पा.स उत्पन्न सुरु होईल तसेच ज्यांना भाजीपाला ,फळे विक्रीसाठी या गाळ्यांची गरज आहेत अशा विक्रेत्यांना त्याचा लाभ होईल. तसेच यामध्ये पथारीवाले सोडून जे विना परवाना धारक विक्रेते जरी इच्छुक असतील तर त्यांचा देखील विचार व्हावा व त्यांना देखील पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून यामध्ये प्राधान्य द्यावे.

तसेच यामध्ये ५०% गाळे हे परवाना धारक विक्रेत्यांना व ५०% गाळे हे विनापरवाना धारक विक्रेत्यांना भाडे तत्वावर पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून द्यावे.

तरी सदर ओटा मार्केट लवकरात लवकर करून वरील कारवाई करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष,शहर सुधारणा समिती यांचे दि.२६/६/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २८ दि.२६/६/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. २९५**

पुणे शहरामध्ये वाढते प्रदुषण व वाढती वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी V-tro motors Pvt Ltd या कंपनीच्या माध्यमातुन ग्रीन पुणेसाठी इलेक्ट्रिक बाईक रेंटींग प्रोजेक्ट ही संकल्पना पुणे शहरामध्ये राबविण्यात येणार असुन या इलेक्ट्रिक बाईक ने प्रवास करण्यासाठी नागरिकांना खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| Rental | Charges | Km | Avg.Charge/Km |
|---|---|---|---|
| Monthly | 3800 | 4000 | 0.95 |
| Weekly | 1900 | 1000 | 1.9 |
| Daily | 450 | 150 | 3 |
| Hourly | 100 | 25 | 4 |
| Per Km | 4 | 1 | 4 |

हि बाईक वापरण्यासठी सरासरी कमीतकमी ९० पैसे पासून ते जास्तीत जास्त ४ रु. किमी याप्रमाणे खर्च पुणेकरांना येणार आहे. तरी सदर प्रकल्प राबविण्यासाठी एक ठिक़ाणी १० बाईक चार्ज होतील असे मुख्य रस्त्यावर एक चार्जींग स्टेशन अशा प्रकारचे पुणे शहराच्या विविध भागामध्ये मुख्य रस्त्यांवर ५०० ठिक़ाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यासह या प्रकल्पास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती यांचे दि.२६/६/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २९ दि.२६/६/२०२० विचारासाठी.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**